ePaper

|| वर्ष - 7 । अंक - 230 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | । शुक्रवार, दिनांक 29 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## महापुरुषांची बदनामी रोखणारा कडक कायदा करा, उदयनराजेंची मागणी



आतील पानांत

- कोहलीच्या संघर्षानंतर भारताचा पराभव
- अभिनेत्री हिना खान रुग्णालयात
- नितीशकुमार यांच्या पक्षात रामायण!
- उत्तर मुंबई अजिबात सोडणार नाही

## चिखली आणि परिसरात खळबळ

# बिबट्या अखेर जेरबंद!

### » मोरे कुटुंबियांनी अनुभवला थरार : वन विभागाची यशस्वी कामगिरी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'त्याला राहायला जागाच उरली नाही, म्हणून तो नाईलाजाने आपल्या जागेत आला. आपण त्याची जागा सुरक्षित ठेवली असती तर तो आज आपल्या जागेत आलाच नसता.' या भावना आहेत, आश्रम रोड, चिखली येथील सुदाम मोरे यांच्या. सुदाम मोरे यांच्या बंगल्याच्या परसात त्यांची जनावरे बांधलेली असतात. तिथेच आज एक बिबट्या आला आणि तो तब्बल तीन तास थांबला. अखेर त्याला वन विभागाने जेरबंद केले.**



पिंपरी:गुरुवारी (दि. 28) पहाटे पाच वाजताच्या सुमारास एक बिबट्या देहू-आळंदी मार्गावरील कुदळवाडी परिसरात आढळला. परिसरातील मोकाट कुत्र्यांनी भुंकून भुंकून बिबट्याला जेरीस आणले. शेवटी आपला जीव वाचवण्यासाठी बिबट्या इकडून तिकडे सैरावैरा पळू लागला. आश्रम रोड, चिखली येथे सुदाम मोरे आणि त्यांच्या चारही भावांचे शेजारी शेजारी आलिशान बंगले आहेत. बंगल्यांना त्यांनी भिंतीचे कुंपण केले आहे.

कुत्र्यांच्या भीतीने बिबट्याने मोरे यांच्या बंगल्याच्या कुंपणावरून उडी मारून आत प्रवेश केला. त्यानंतर सर्व मोकाट कुत्री मोरे यांच्या बंगल्याच्या गेटवर जमा झाली. कुत्र्यांच्या भुंकण्याचा एकसारखा आवाज ऐकल्याने सुदाम मोरे यांच्याकडे काम करणारा एक कामगार सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास उठला आणि पाहणी केली. तर बंगल्याच्या आवारात चक्क एक बिबट्या आला असल्याचे कामगाराला दिसले. बिबट्याला पाहून कामगाराची पाचावर धारण बसली. त्याने सुदाम मोरे यांना याबाबत माहिती दिली. दरम्यान नागरिकांनी पोलिसांना आणि वनविभागाला याबाबत माहिती दिली होती. आपल्या परिसरात बिबट्या आला असल्याची माहिती परिसरात वाऱ्याच्या वेगाने पसरली. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

### पाच तासांच्या प्रयत्नांना यश...

» सकाळी वन विभागाचे एक पथक दाखल झाले. त्यावेळी बिबट्या आणि मोरे कुटुंबियांची सहा जनावरे एकाच परसात होती. बिबट्याने एकाही जनावराला इजा केली नाही. एका बंगल्यातून दुसऱ्या बंगल्यात उड्या मारत बिबट्याने शेजारी असलेल्या मोरे यांच्या शेतात धाव घेतली. ज्वारीच्या शेतात पसार झालेल्या बिबट्याला वन विभागाने तब्बल पाच तासाच्या प्रयत्नानंतर पकडले.

### नैसर्गिक अधिवास सुरक्षित केले पाहिजेत : सुदाम मोरे

»बिबट्या त्याचा जीव वाचवण्यासाठी इकडून तिकडे पळत होता. त्याने कुणालाही इजा केली नाही. आमच्या घरासमोर बांधलेल्या जनावरांना देखील त्याने काही केले नाही.' 'आपण जंगलतोड केली. त्यामुळे जंगली प्राण्यांना राहायला जागाच उरली नाही. म्हणून ते प्राणी आता मानवी वस्तीत दाखल होत आहेत. जीव वाचवून जगण्याची धडपड ते प्राणी करीत आहेत. आपण त्यांचे जंगल, नैसर्गिक अधिवास सुरक्षित केले पाहिजेत, असेही सुदाम मोरे यांनी सांगितले.

# उपयोगकर्ता शुल्क वसुलीतून नागरिकांची मुक्तता!

## » कर संकलन व कर आकारणी विभागाच्या संगणक प्रणालीत बदल

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

पिंपरी-चिंचवड महापालिकेने मिळकतधारकांना लावलेल्या उपयोगकर्ता शुल्काला राज्य शासनाने स्थगिती दिल्यानंतर कर संकलन विभागाने मिळकतकर बिलाच्या संगणक प्रणालीत बदल केला आहे. त्यामुळे मालमत्ता धारकांना उपयोग कर्ता शुल्क न भरता आपला मुळ मिळकत कर भरतात येणार आहे.



उपयोगकर्ता शुल्क वसूल करण्यास राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने तात्पुरती स्थगिती देत मुख्यमंत्र्यांसमवेत त्यासंदर्भात बैठक होईपर्यंत शुल्क वसुली न करण्याचे आदेश महापालिकेस (दि. 20) डिसेंबर रोजी दिले. त्यानंतर आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे यांनी शासन आदेशाची अंमलबजावणी करावी, अशा सूचना कर संकलन व कर आकारणी विभागाला दिल्या होत्या. यानंतर कर संकलन व कर आकारणी विभागाने संगणक प्रणालीत बदल केला आहे. त्यानुसार 26 डिसेंबरपासून नागरिकांच्या ऑनलाईन बिलात उपयोग कर्ता शुल्क स्थगिती आदेशाची अंमलबजावणी सुरू केली आहे.



"राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने दिलेल्या आदेशानुसार उपयोग कर्ता शुल्क वसुल करण्यास स्थगिती दिली आहे. त्यानुसार कर संकलन व कर आकारणी विभागाच्या संगणक प्रणालीत बदल करण्यात आला आहे.

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक. द्यावा.**

# दीड लाख मतदारांचे चेहरे एकसारखे!

## » खोट्या कागदपत्राच्या आधारे मतदारकार्ड काढण्याचा प्रयत्न

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**निवडणूक आयोगाने विविध माध्यमांतून मतदार यादी शुद्धीकरणासाठी कार्यवाही सुरू केलेली आहे. त्यात पुणे जिल्ह्यात दुबार नाव नोंदणीचे २८ हजार, तर समान छायाचित्रांचे १ लाख ४२ हजार ३४९ मतदार आढळले असून, निवडणूक आयोगाने एकापेक्षा अधिक ठिकाणी समान छायाचित्र, एकापेक्षा जास्त ठिकाणी मतदारांच्या इतर माहितीमध्ये साधर्म्य आढळलेल्या किंवा दुबार नाव नोंदणी आढळलेल्या मतदारांना 'नमूना अ'मध्ये नोटीस पाठविल्या आहेत.**

भारतीय लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० च्या कलम १७ व १८ नुसार एका मतदाराची मतदार यादीमध्ये एकच नोंद असणे, निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी मतदार यादी त्रुटीरहीत असणे आवश्यक आहे. मात्र, काही मतदारांचे नाव एकापेक्षा जास्त ठिकाणी नोंद असल्याचे आढळले आहे. त्यामुळे संबंधित मतदारांना दुरुस्ती करण्याबाबत नोटीस बजावण्यात आली आहे. नोटिशीवरील पर्याय निवडून १ जानेवारी २०२४ पर्यंत दुरुस्ती करून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केले आहे. या नोटिशीद्वारे कोणत्या एका ठिकाणी नाव अपेक्षित आहे, हे ठरविण्याचा अधिकार मतदाराला दिला आहे. संबंधित मतदाराने ज्या ठिकाणी त्याचे नाव असणे त्यांना स्वतःला अभिप्रेत आहे त्या ठिकाणी बरोबरची खूण करावी आणि दिलेल्या ईमेल पत्त्यावर आधारकार्डच्या छायाप्रतीसह अपलोड करावे किंवा संबंधित मतदार केंद्रस्तरीय अधिकारी यांची भेट घेवून त्यांच्यामार्फत पुष्टीकरण पत्रावर कार्यवाही करणे आवश्यक आहे. या मोहिमेनंतर दोन ठिकाणी मतदाराचे नाव आढळल्यास निवडणूक आयोगाच्या सुचनेप्रमाणे



त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असेही देशमुख यांनी स्पष्ट केले. मुळशी तहसील कार्यालयाअंतर्गत खोट्या कागदपत्राच्याआधारे मतदार नोंदणी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पौड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अशा प्रकारच्या घटना आपल्या परिसरात घडत असल्याचे निदर्शनास आल्यास नजीकच्या तहसील किंवा तलाठी कार्यालय, पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकाऱ्याने केली आहे. तसेच तहसीलदार तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी रणजीत भोसले यांनी केले आहे. मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत 203 भोर मतदार संघ ता. मुळशी येथील पिरंगुट व यादी भाग क्र. 204 मुकाईवाडी येथे मतदार नोंदणीसाठी ऑनलाईन पद्धतीने मोठ्या प्रमाणात अर्ज क्र.6 दाखल करण्यात आले. या अर्जासोबत रहिवासी पुरावा म्हणून विद्युत देयक जोडण्यात आले होते.

याबाबत शंका आल्याने महावितरणच्या संकेतस्थळावर पडताळणी केली, असता विद्युत देयकांवरील नाव व पत्त्यात तफावत असल्याचे आढळून आले. याप्रकरणी खोटे विद्युत देयक रहिवासी पुरावा म्हणून सादर केल्याबद्दल विजय मारणे, अमित शिंदे, भाऊसाहेब मोकर, शकील अहमद व महंमद आलम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादी अंतिम प्रसिद्धी 5 जानेवारी ऐवजी 22 जानेवारी 2024 रोजी होणार असून त्यासाठीचा सुधारित कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने घोषित केला आहे. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाअंतर्गत मोठ्या प्रमाणात छायाचित्र समान नोंदी, भौगोलिकदृष्ट्या समान नोंदी घेणे आणि अर्ज प्रलंबित असल्याने भारत निवडणूक आयोगाने कार्यक्रमात सुधारणा करण्यात आली आहे.

पुनरीक्षण उपक्रमाअंतर्गत दावे व हरकती निकाली काढण्याच्या सध्याची तारीख 26 डिसेंबर 2023 ऐवजी 12 जानेवारी 2024 करण्यात आली आहे. मतदार यादीचे मानांकन तपासणे, अंतिम प्रसिद्धीसाठी आयोगाची परवानगी घेणे, अभिलेख अद्ययावत करणे व पुरवणी याद्यांची छपाई करण्याची तारीख 1 जानेवारी 2024 ऐवजी 17 जानेवारी 2024 करण्यात आली आहे. मतदार यादी अंतिम प्रसिद्धी 5 जानेवारी ऐवजी 22 जानेवारी 2024 रोजी होईल, अशी माहिती उप जिल्हाधिकारी मिनल कळसकर यांनी दिली आहे.

### दुरुस्ती करून घेण्याचे आवाहन

» निवडणूक आयोगाने विविध माध्यमातून मतदार यादी शुद्धीकरणासाठी कार्यवाही सुरु केलेली आहे. संबंधितांनी त्यांना मिळालेल्या नोटीशीवरील पर्याय निवडून 1 जानेवारी 2024 पर्यंत दुरुस्ती करून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केले आहे. निवडणूक आयोगाने विविध माध्यमांतून मतदार यादी शुद्धीकरणासाठी कार्यवाही सुरू केलेली आहे. त्यात पुणे जिल्ह्यात दुबार नाव नोंदणीचे २८ हजार, तर समान छायाचित्रांचे १ लाख ४२ हजार ३४९ मतदार आढळले असून, निवडणूक आयोगाने एकापेक्षा अधिक ठिकाणी समान छायाचित्र, एकापेक्षा जास्त ठिकाणी मतदारांच्या इतर माहितीमध्ये साधर्म्य आढळलेल्या किंवा दुबार नाव नोंदणी आढळलेल्या मतदारांना 'नमूना अ'मध्ये नोटीस पाठविल्या आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचे महाराष्ट्रात दौरे का वाढले?

## » मविआच्या बाजूनं कौल आणि त्यामुळे दौरे वाढले : अमोल कोल्हे

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी लवकरच नाशिक दौऱ्यावर येणार आहेत. मागील काही दिवसांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महाराष्ट्रातील दौऱ्यात मोठी वाढ झाली. याबाबत अमोल कोल्हे यांनी तिखट शब्दात प्रतिक्रिया दिली. सातत्याने जे सर्व्हे आलेत त्यात मविआच्या बाजूनं कौल आणि पारडं जड दिसतोय. त्यामुळे पंतप्रधानांचे दौरे वाढले असावेत, असा टोला अमोल कोल्हेंनी लगावला. ते शेतकरी आक्रोश मोर्चामध्ये बोलत होते.**

पंतप्रधानांचे एखाद्या राज्यात दौरे वाढले की त्या राज्यांच्या निवडणुका लागल्या, असं म्हटलं जातं. तूर्तास राज्यातील सरकार सक्षम आहे, असं ते म्हणतात. त्यामुळं तूर्तास तरी निवडणुका लागणार नाहीत, असं चित्र आहे. उत्तर प्रदेशनंतर महाराष्ट्रात सर्वाधिक खासदार आहेत. परंतु सातत्याने जे सर्व्हे आलेत त्यात मविआच्या बाजूनं कौल आणि पारडं जड दिसतोय. त्यामुळे पंतप्रधानांचे दौरे वाढले असावेत, असा टोला अमोल कोल्हेंनी लगावला. पंतप्रधान हे संसदेत फारसे दिसले नाहीत. संसदेत आम्ही बोलतो तेंव्हा ते तोंड बंद करतात. मात्र एवढे शेतकरी मंत्री जर या मोर्चाची दखल घेत असतील तर त्यांनीच शेतकऱ्यांचे हे त्यांनी दिल्ली दरबारी ठामपणे मांडावेत, असे कोल्हे म्हणाले. आकडेवारी



ही सांगत राहणं, याची महाराष्ट्राला सवय झालेली आहे. खरोखर नेमके किती रोजगार निर्माण होतात, यावर ते अवलंबून आहे. कारण भाजप जेंव्हा इतक्या विश्वासाने सांगतं, तेंव्हा काही दिवसांनी ते म्हणतात "ये तो जुमला था." असा टोला कोल्हेंनी लगावला. गडकरी साहेबांबाबत देशातील प्रत्येकाला नितांत आदर आहे. संसदेत जेंव्हा ही ते बोलतात, तेंव्हा गेल्या साडे चार वर्षात त्यांच्यावर एकाने ही आरोप केलेलं पाहिलं नाही. गडकरी साहेब हे सर्वसमावेशक काम करतात, म्हणून त्यांची बात ही अलग है. या भेटी राजकारणातील सुसंस्कृतता सिद्ध करते, राजकारणात कोणी कोणाचं वैर नसतो. त्यामुळं ही सुसंस्कृतता जपली गेली पाहिजे, असे कोल्हे म्हणाले. काहीवेळा एक मंत्री म्हणाले सेलिब्रिटी आहे असं म्हणतात त्यांचं काही राजकारणात चालत नाही, असं म्हणतात. मी शेतकऱ्यांचा पोरगा आहे, शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत बोलणारच. आता राजकारणात राहून अभिनय करण्यापेक्षा अभिनय करताना राजकारण करणं बरं. किमान सच्चाई आणि सच्चेपना शेतकऱ्यांसह मातीशी इमान राखण महत्वाचं आहे. माझी हीच विनंती आहे, की टीका टिप्पणी करण्यापेक्षा हा प्रश्न शेतकऱ्यांचा आहे हे लक्षात ठेवा, असे कोल्हे म्हणाले. हसन मुश्रीफ यांच्याशी माझं बोलणं झालेलं नाही, पण त्यांचा गैरसमज झाला असेल तर दूर करेन.

### अनिल पाटलांच्या आरोपांना उत्तर

» काहीवेळा एक मंत्री म्हणाले सेलिब्रिटी आहे असं म्हणतात त्यांचं काही राजकारणात चालत नाही, असं म्हणतात. मी शेतकऱ्यांचा पोरगा आहे, शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत बोलणारच. आता राजकारणात राहून अभिनय करण्यापेक्षा अभिनय करताना राजकारण करणं बरं. किमान सच्चाई आणि सच्चेपना शेतकऱ्यांसह मातीशी इमान राखण महत्वाचं आहे. माझी हीच विनंती आहे, की टीका टिप्पणी करण्यापेक्षा हा प्रश्न शेतकऱ्यांचा आहे हे लक्षात ठेवा, असे कोल्हे म्हणाले.

# ... तर वादग्रस्त 'टीडीआर'ची माघार!

## » आयुक्तांची सावध भूमिका : संपूर्ण प्रक्रिया व निर्णय कायदेशीर

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाकडमधील टीडीआरचा निर्णय योग्य आणि कायदेशीर आहे. सर्व बाजू पडताळून निर्णय घेतला आहे. परंतु, अनेकांनी आक्षेप घेतले असून त्याची शहानिशा केली जाईल. काही त्रुटी आढळल्यास माघार घेतली जाणार असल्याचे आयुक्त शेखर सिंह यांनी स्पष्ट केले.**





आयुक्त सिंह म्हणाले की, पीएमपीएमएलच्या मान्यतेने नकाशा तयार करुन मंजुर विकास योजनेनुसार पीएमपीएमएल बस डेपोच्या आरक्षणाचा एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (युडीसीपीआर) मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) वापरुन पीएमपीएमएलसाठी आवश्यक ते बांधकाम व त्यावर वाणिज्य बांधकाम असे इमारतीचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रस्तावास महापालिकेच्या समावेशक आरक्षण समितीने तत्वत: मान्यता दिल्यानंतर बांधकाम नकाशांना मंजुरी देऊन समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन आरक्षणाचा विकास करण्याबाबत विकसक व महानगरपालिका यांच्यामध्ये नोंदणीकृत करारनामा कऱण्यात आला आहे.

या करारनाम्यामध्ये बांधकामाचे एकुण क्षेत्रफळ, अंदाजपत्रकीय रक्कम, बांधकामाची व बांधकाम साहित्याची गुणवत्ता, काम करण्याचा कालावधी, विलंब झाल्यास दंड, अनुज्ञेय टीडीआर यासह आवश्यक त्या अटी व शर्ती टाकण्यात आल्या आहेत. समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन विकास करण्याच्या प्रस्तावास समावेशक आरक्षण विकास समितीने मे 2023 मध्ये मान्यता दिल्यानंतर बांधकाम परवानगी देऊन या बांधकामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी देण्यात आली आहे.

त्यानंतर पर्यावरण विभागाने तत्वत: मान्यता दिल्यानंतर विकसकांनी जागेवर (TDR) खोदकाम सुरु केले आहे. या 2 हेक्टर जागेला चांगल्या प्रकारची वाणिज्य क्षमता असल्याने संपुर्ण चटई क्षेत्र निर्देशांक वापरुन मंजुर विकास योजनेनुसार आरक्षणाचा विकास करण्यात येऊन उर्वरित क्षेत्रामध्ये वाणिज्य बांधकाम करणार आहे.

### कोणतीही अनियमितता नाही : आयुक्त



» आरक्षण विकसनानंतर महानगरपालिकेला युडीसीपीआर नियमातील तरतुदीनुसार आरक्षणाखालील जागा व संपुर्ण बांधकाम विनामुल्य मिळणार आहे. त्यासाठी महानगरपालिकेच्या तिजोरीतुन कोणताही खर्च करावा लागणार नाही. तसेच वाणिज्य बांधकामामधुन महानगरपालिकेला भाडे स्वरुपात उत्पन्नाचा स्त्रोत कायमस्वरुपी सुरु होईल. महानगरपालिकेचे हित विचारात घेऊन नियमानुसार व कायदेशीर प्रक्रिया राबवुन या प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे, त्यामध्ये कोणतीही अनियमितता नाही, असे आयुक्त सिंह यांनी सांगितले.

# खेळाडू दत्तक योजनेच्या अंमलबजावणीसाठी पुढाकार!

## » आमदार महेश लांडगे यांची मागणी : क्रीडा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या धोरणानुसार खेळाडू दत्तक योजनेची कार्यवाही सुरू करून चालू आर्थिक वर्षात खेळाडुंना या योजनेचा लाभ मिळवून द्यावा, अशी सूचना आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**

याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा, आंतरविद्यापीठ तसेच राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती दिली जाते.

राज्य शासनाच्या क्रीडा विभागाच्या सूचनेनुसार पिंपरी-चिंचवड महापालिका त्याची अंमलबजावणी करणार आहे. त्यासाठी महापालिकेच्या क्रीडा विभागाकडे अर्ज सादर करण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे. त्यानुसार शहरातील गुणवंत खेळाडूंना साडे तीन हजार ते साडे पाच हजार रुपयांपर्यंत वार्षिक क्रीडा शिष्यवृत्तीचा हातभार लावला जाणार आहे. 2022-23 या वर्षाची क्रीडा शिष्यवृत्ती 2023-24 मध्ये पात्र विद्यार्थी खेळाडूंना देण्यात येणार आहे.

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटी तर्फे आयोजित आंतरविद्यापीठ (राष्ट्रीय) स्तरावर सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंना वार्षिक 3 हजार 300 रुपये मिळणार आहेत.

तर राष्ट्रीय शालेय स्पर्धात (नॅशनल स्कूल गेम / स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया) तर्फे आयोजित राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थी खेळाडूंना 5 हजार 500 रुपये क्रीडा शिष्यवृत्ती देण्याची योजना आहे. या धोरणाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी सूचनाही आमदार लांडगे यांनी केली आहे.



> “ पिंपरी-चिंचवड शहराची ओळख 'स्पोर्ट्स सिटी' व्हावी. या करिता आम्ही प्रयत्नशील आहोत. आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती केंद्र, कबड्डी प्रशिक्षण केंद्र, आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय स्टेडिअम असे महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकारत आहेत. त्यामुळे स्थानिक खेळाडुंना हक्काचे व्यासपीठ निर्माण झाले आहे. शहरातील गुणवंत खेळाडुंना प्रोत्साहन मिळावे. या करिता सुरू केलेल्या क्रीडा शिष्यवृत्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा आहे. महापालिका प्रशासन त्यादृष्टीने कार्यवाही करेल, असा विश्वास आहे.
>
> -महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# रावेत येथे महापालिका स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारणार

। पिंपरी ।

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने रावेत येथे नवीन अग्निशमन केंद्र उभारण्यात येणार आहे. आगीच्या घटनांवर तात्काळ नियंत्रण मिळविण्यासाठी शहरभरात केंद्र उभारण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. रावेत केंद्रासाठी ३० कोटींचा खर्च करण्यात येणार आहे. त्याला आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सर्वसाधारण सभेची प्रशासकीय मान्यता दिली आहे.

शहराची लोकसंख्या ३० लाखांवर गेली आहे. उद्योग, व्यवसाय व नोकरीसाठी नागरिकांचा पिंपरी-चिंचवड शहराकडे ओढा असल्यामुळे शहराच्या चारी बाजूस लोकवस्ती वाढत आहे. लोकसंख्या वाढत असल्याने शहराची लोकसंख्या फुगत आहे. त्यामुळे शहरात विविध ठिकाणी १८ अग्निशमन केंद्रांची गरज आहे. सध्या केवळ ८ केंद्र सुरू आहेत. आणखी दहा केंद्र उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.



## भूमिका

**जगभर सध्या सशस्त्र संघर्षांचे जे टापू निर्माण झाले आहेत, त्यात युक्रेन-रशिया सीमेबरोबरच इस्रायल-गाझा टापूचाही उल्लेख करावा लागेल. परंतु युक्रेन-रशिया संघर्षांची व्याप्ती वाढण्याची इतक्यात तरी शक्यता नाही. इस्रायल-गाझा संघर्षांबाबत मात्र तसे म्हणता येत नाही. या संघर्षांमध्ये इस्रायलच्या बाजूने आणि हमास-पॅलेस्टाइनच्या बाजूने काही सत्ता खेचल्या जाण्याची शक्यता होतीच.**

# लाल समुद्रात लाल बावटा!



इस्रायलविरोधात छुपे वा प्रकट हल्ले करण्यास सुरुवात केली आहे. इस्रायलच्या उत्तरेकडे असलेल्या लेबनॉनमध्ये स्थित हेझबोला संघटनेकडून हमासच्या समर्थनार्थ इस्रायलच्या विरोधात हल्ले केले जातील, असा अंदाज होता. पण हेझबोलाने अजून तरी फारशा कुरापती काढलेल्या नाहीत. मात्र एका वेगळयाच संघटनेकडून आणि पूर्णपणे वेगळया दिशेकडून हमासच्या समर्थनार्थ इस्रायलविरोधी हल्ले सुरू झाले आहेत. या हल्ल्यांचा रोख लाल समुद्रातील इस्रायली आणि इस्रायलमित्र देशांच्या व्यापारी जहाजांकडे आहे. छोटया तीव्रतेची क्षेपणास्त्रे आणि ड्रोनच्या माध्यमातून सुरू झालेले हे हल्ले येमेनस्थित हुथी बंडखोरांकडून होत आहेत. ७ ऑक्टोबर रोजी हमासच्या हल्ल्यानंतर गाझा संघर्ष सुरू झाला. त्यानंतर लगेचच म्हणजे १९ ऑक्टोबर रोजी लाल समुद्रात संचार करणाऱ्या यूएसएस कार्नी या अमेरिकी विनाशिकेवर चार क्षेपणास्त्रे डागली गेली आणि १५ ड्रोन हल्ले झाले. हुथींकडून आलेल्या या क्षेपणास्त्रांचा अमेरिकी विनाशिकेने सहज लक्ष्यभेद केला. पण सागरी व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत मोक्याच्या असलेल्या या टापूमध्ये मालवाहू व्यापारी जहाजे आणि तेलवाहू जहाजांच्या सुरक्षेचा प्रश्न त्यामुळे निर्माण झाला. याचे कारण अमेरिका आणि तिच्या मित्रदेशांच्या नौदल नौका स्वत:चा बचाव करून घेण्यासाठी पुरेशा सक्षम आहेत. परंतु व्यापारी जहाजे आणि मालवाहू टँकरना अशा प्रकारे सुसज्ज सुरक्षा व्यवस्था बाळगता येईलच असे नाही. लाल समुद्रातील वाहतूक अतिशय महत्त्वाची आहे. कारण भूमध्य समुद्रातून सुएझ कालव्यामार्गे लाल समुद्र व एडनच्या आखातातून अरबी समुद्र ते हिंद महासागर असा हा विस्तीर्ण आणि व्यापारीदृष्टया मोक्याचा जलमार्ग आहे. हुथी बंडखोरांना इराणचे शस्त्रास्त्रे आणि संपत्तीच्या माध्यमातून भक्कम पाठबळ आहे. सौदी अरेबियाविरुद्ध येमेनमध्ये वरचष्मा गाजवण्यासाठी इराणने हुथींना सुसज्ज केले. यातून सौदी अरेबियाचा अप्रत्यक्ष पराभव झाला, तरी हुथी शिरजोर बनले. आता तर ते इराणलाही जुमानत नाहीत. पश्चिम आशिया अस्थिर आणि अस्वस्थ करण्यामागे इराणची वर्चस्वाकांक्षा असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. इस्रायल आणि अमेरिका या कट्टर शत्रूंविरोधात थेट इस्रायली भूमीवर न लढता, वेगळयाच टापूमध्ये त्यांच्यावर कुरघोडी करण्याची ही खोड जागतिक व्यापार आणि अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने मात्र तापदायी ठरू लागलेली आहे. या झळकक्षेत भारतही येऊ लागला आहे. कारण हुथींचे हल्ले अरबी समुद्रात म्हणजे भारताच्या वेशीवर येऊन ठेपले आहेत. इस्रायलमध्ये नोंदणी झालेल्या एमव्ही केम प्लुटो या रसायनवाहू जहाजावर गुजरातपासून २०० नॉटिकल मैलांवर (३७० किलोमीटर) हल्ला करण्यात आला. लाल समुद्रातून मोठया प्रमाणात तेलाची वाहतूकही होते. या तेलवाहू जहाज कंपन्यांनी आता वाहतुकीवर अतिरिक्त जोखीममूल्य आकारण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर दोन ते पाच टक्क्यांनी वधारले आहेत. भारताला सध्या रशियाकडून प्राधान्याने तेलपुरवठा होतो आणि रशिया-इराण संबंध सुरळीत असल्यामुळे या तेलवाहू जहाजांना अद्याप हुथींनी लक्ष्य केलेले नाही. मात्र धान्य, रसायने, खनिजे, खते घेऊन येणाऱ्या जहाजांवर अशी मेहेरनजर होईलच असे नाही. लाल समुद्रातील या अनपेक्षित हल्ल्यांचा 'लाल बावटा' जागतिक व्यापार पुन्हा एकदा संकोचण्यास कारणीभूत ठरू लागला आहे. भारतासारख्या प्रगतशील अर्थव्यवस्थेसाठी हे चांगले लक्षण नाही. लाल समुद्र टाळून दक्षिण आफ्रिकेच्या 'केप ऑफ गुड होप' भूशिराला वळसा घालून मालवाहतूक करणे अतिशय खर्चीक आहे. तेव्हा इस्रायल-हमास संघर्ष थांबणे किंवा अमेरिकेच्या पुढाकाराने तथाकथित 'ऑपरेशन प्रॉस्परिटी गार्डियन' येमेनच्या भूमीवर हुथी तळ उद्ध्वस्त करून ही समस्या मुळापासून उखडून काढणे अमेरिकेच्या दृष्टीने अतिशय जोखिमीचे ठरेल.

## संपादकीय »

### नव्हे केशवपन!

***'रिलायन्स कम्युनिकेशन इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड' ही एके काळची दूरसंचार कंपनी काळाच्या ओघात आणि 'जिओ'च्या प्रभावामुळे दिसेनाशी झाली.***

दोन उद्योगपती बंधूंतील एकाचा, धाकटयाचा, एक उद्योग गाळात जातो. तो सुमारे ४७ हजार कोटी रुपयांचे देणे लागत असतो. ते फेडणे अशक्य झाल्याने सदर कंपनी अवसायनात निघते. प्रकरण अंतिम निर्णयासाठी राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरणाकडे (नॅशनल कंपनी लॉ ट्रायब्यूनल, एनसीएलटी) येते. ज्येष्ठ न्यायमूर्तीयुक्त सदर लवाद हे प्रकरण निकालात काढतो. आणि ४७,२५१ कोटी रुपयांचे कर्ज असलेली ही कंपनी अवघ्या ४५५ कोटी रुपयांत विकत घेण्याचा प्रस्ताव मान्य केला जातो. ही दंतकथा नुकतीच मुंबईत घडली आणि तरीही या कानाचे त्या कानास कळले नाही. नाताळाच्या जोड सुट्टया सुरू होत असताना १९ डिसेंबरच्या या निर्णयाचे निकालपत्र नेमके २२ डिसेंबरच्या शुक्रवारी हाती आल्याने त्याकडे दुर्लक्ष झाले असे आपण आपले समाधान करून घेण्यास हरकत नाही.

**संपूर्ण जगासाठी पाण्याच्या मुद्दयांसंदर्भात २०२३ हे वर्ष महत्त्वाचे ठरले. कारण २०१७ साली संयुक्त राष्ट्रे (यूएन) आणि सगळया देशांनी मिळून 'शाश्वत विकासा'चे उद्दिष्ट साधण्याच्या दृष्टीने पाणी प्रश्नावर काम करण्यासाठीचा ठराव केला. त्यासाठी २०१८ ते २०२८ हे दशक जाहीर करण्यात आले.**

# पाण्यासाठी सरकारने काय काय केले?



पाणी हा आता जागतिक प्रश्न झाला आहे. संयुक्त राष्ट्र द्वारा स्थापित 'इंटरगव्हर्न्मेंटल पॅनल ऑन क्लायमेट चेंज' या संस्थेने २०२१ साली 'द सिक्स्थ असेसमेंट रिपोर्ट' प्रकाशित केला. त्यात पाण्याचे चक्र बिघडण्याचे मुख्य कारण वैश्विक तापमान वाढ (ग्लोबल वॉर्मिग) हे असल्याचे नमूद केले आहे. त्याचा परिणाम वाढता कोरडा-ओला दुष्काळ, चक्रीवादळे, पाणीटंचाई, पाण्याची गुणवत्ता खालावणे, आणि त्यामुळे वाढणारे संसर्गजन्य आजार यात दिसतो. वाढत्या तापमानामुळे ऋतूंमध्ये अचानक आणि मोठे बदल घडत असून त्याचा परिणाम पिण्याचे पाणी, शेती आणि ऊर्जा निर्मितीवर होत आहे. याचे दुष्परिणाम जगातल्या एकूण लोकसंखेच्या ४० टक्क्यांपेक्षा जास्त लोकांवर होत आहेत वा होणार आहेत. भारताची परिस्थिती आणखी विदारक आहे. कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायर्न्मेंट अँड वॉटर यांच्या अभ्यासातून गेल्या दोन दशकात भारतातील वातावरणात बदल होण्याची गती आणि तीव्रता खूप वाढली आहे. त्यामुळे येणारा सुका-ओला दुष्काळ व चक्रीवादळांमुळे आतापर्यंत भारताला जवळजवळ रु. ५.६१ लाख कोटी नुकसान सोसावे लागले आहे. या संस्थेच्या दुसऱ्या अहवालानुसार, भारतातील ७५ टक्के जिल्ह्यांमध्ये सुका-ओला दुष्काळ, चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक संकटांचा धोका आहे. या सगळयाचे दुष्परिणाम पाण्याच्या उपलब्धतेवर होत असून वातावरणातल्या बदलांमुळे पावसाचे चक्र बिघडले आहे. शेतकऱ्यांना अवेळी, अनियमित पावसाचा सामना करावा लागत आहे. परिणामी त्यांना शेतीसाठी (भूजल) जमिनीतल्या पाण्यावर जास्त अवलंबून राहावे लागत आहे. यामुळे जमिनीतून पाणी उपसण्याचे प्रमाण वाढते आहे. 'सेंट्रल ग्राऊंड वॉटर बोर्ड'च्या विश्लेषणानुसार, देशामधील ३० टक्के तालुक्यांची स्थिती गंभीर असून तेथील जमिनीमधील एकूण पाणी साठयापैकी ७० टक्क्यांपेक्षा जास्त पाणी दरवर्षी उपसले जात आहे. आणि दुर्दैवाची गोष्ट अशी की, ८० टक्के ग्रामीण भागातल्या पाणीपुरवठयाच्या योजना या जमिनीतल्या पाण्यावर अवलंबून आहेत. या पाण्याच्या वापरासाठीचे लागणारे नियमनाचे कोणतेही धोरण भारतात नाही. भारत सरकारने २०23 मध्ये तीन महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर न्यायपूर्ण आणि शाश्वत पद्धतीने हवामान सुधारणा तसेच जमिनीतल्या-जमिनीवरच्या पाण्याचे नियोजन कसे केले जाणार आहे, यावर आपली भूमिका मांडली आहे. यावर्षी भारताने जी-ट्वेंटीचे अध्यक्षपद भूषविले होते. त्यात 'ग्लोबल वॉटर डायलॉग' अशी संकल्पना होती, ज्यामध्ये शाश्वत विकास उद्दिष्ट समोर ठेवून २०३० सालापर्यंत पाण्याच्या स्रोतांचे नियोजन कसे केले जाणार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# उत्तर मुंबई अजिबात सोडणार नाही!

## 23 जागाही अमान्य, काँग्रेसने ठाकरेंना डिवचलं

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुका (LOK SABHA ELECTION 2024) अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत. देशभरात लोकसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरु झाली. भाजपच्या विरोधात इंडिया आघाडीनेही कंबर कसली आहे. पण महाराष्ट्रात महाविकास आघाडीमध्ये जागावाटपावरुन रस्सीखेच सुरु असल्याचे दिसेतय. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेने लोकसभेच्या 23 जागांवर दावा ठोकलाय, पण काँग्रेस नेत्यांकडून या दावा फेटाळला आहे.**

त्याशिवाय काँग्रेसने मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघावर दावा ठोकलाय, ही जागा कोणत्या परिस्थितीत सोडणार नसल्याचे काँग्रेस नेते संजय निरुपम यांनी सांगितलेय. मुंबई उत्तर मतदारसंघात सध्या भाजपचा खासदार आहे. 2019 लोकसभा निवडणुकीत भाजपचे गोपाळ शेट्टी यांनी विजय मिळवला होता. काँग्रेस उमेदवार उर्मिला मातोंडकर यांचा पराभव झाला होता. गोपाळ शेट्टी यांना 706678 इतकी मते मिळाली होती. तर उर्मिला मातोंडकर यांना 241431 मतांवर समाधान मानावे लागले होते. आता हा मतदार संघ कुणाकडे जाणार? याची चर्चा आहे. मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघावर काँग्रेसनं दावा केला. संजय निरुपम म्हणाले की, जागा वाटपामध्ये सगळ्यांनी कॉम्प्रोमाइज करायला हवं. मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघासाठी कुठल्याही प्रकारे काँग्रेस कॉम्प्रमाईज करणार नाही. कोणतेही परिस्थितीत ही जागा काँग्रेस लढेल. संजय राऊत 23 जागांची लिस्ट घेऊन आमच्या काँग्रेसच्या वरिष्ठांकडे गेले आहेत. ते जर एवढ्या जागा लढवणार असतील तर आम्ही काय करायचं? असा सवाल संजय निरुपम यांनी उपस्थित केलाय. वंचित बहुजन आघाडीने बारा जागांचे प्रपोजल दिलं आहे, अशा पद्धतीची बातमी



मीडियामध्ये पाहिली. एवढ्या जागा ते घेणार असतील तर बाकीच्यांना काय करावे? हा माझा प्रश्न आहे? इंडिया आघाडीमध्ये तुम्ही येत आहात, मात्र जागांची मागणी करताना काळजी घ्या, असेही निरुपम म्हणाले. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते अशोक चव्हाण म्हणाले की, इंडिया आघाडीमधील पक्षामध्ये एकी असणं गरजेचं आहे. प्रत्येक पक्षाला जास्तीत जास्त जागा हव्यात. पण सध्याच्या परिस्थितीमद्ये शिवसेना उद्धव ठाकरे गटाची 23 जागांची मागणी खूप जास्त होतेय. काँग्रेसकडून शिवसेना उद्धव ठाकरेंचा लोकसभा निवडणुकीतील उमेदवारांचा प्रस्ताव नाकारला. पण दुसरीकडे शिवसेना मात्र आपल्या जांगावर ठाम आहे. शिवसेना (ठाकरे गट) नेते अरविंद सावंत यांनी आम्ही 23 जागांवर ठाम असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, आम्ही इंडिया आघाडीत राज्यातील 48 पैकी 23 जागांवर ठाम आहोत. मागील आणि त्याच्या मागील लोकसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसच्या किती विजयी जागा होत्या ? मागच्या लोकसभा निवडणुकीत फक्त काँग्रेस एका जागेवर विजयी झालं. आणि ती जागा बाळू धानोरकर यांची होती, ती जागासुद्धा शिवसेनेची होती. आता त्यावरूनच तुम्ही समजून घ्या !! तुम्हाला किती जागा हव्यात? या सगळ्यावर शरद पवार उद्धव ठाकरे राहुल गांधी खर्गे निर्णय घेतील यावर जास्त वाद घालायला नको. उत्तर मुंबई काय काँग्रेस सगळ्या जागा मागू शकतो, असेही अरविंद सावंत म्हणाले. पाच राज्यांतील निवडणुकांचा निकाल समोर आल्यानंतर लोकसभा निवडणुकीची जय्यत तयारी सुरू झाली आहे. आगामी लोकसभा निवडणूक इंडिया आघाडी विरुद्ध एनडीए अशी रंगणार आहे. या आघाडी आणि युतीमध्ये देशातील सर्व स्थानिक आणि राज्यपातळीवरचे पक्ष सामील झाले आहेत. त्यामुळे दोन्हींकडेही जागावाटपाचा मोठा तिढा निर्माण झाला आहे. इंडिया आघाडीतही अशीच समस्या निर्माण झाल्याने जागा वाटपाबाबत रोज नवनवे खुलासे समोर येत आहेत.

### काँग्रेसची व्होटबँक फिक्स

» दरम्यान, इंडिया आघाडी अंतर्गत महाराष्ट्रात महाविकास आघाडी एकत्र निवडणूक लढवणार आहे. परंतु, ठाकरे गट, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात जागावाटपावरून संघर्ष सुरू आहे. यावरून काँग्रेसचे नेते संजय निरुपम यांनी ठाकरे गटावर टीका केली आहे. ठाकरे गटाने महाविकास आघाडीत ४८ पैकी २३ जागांसाठी प्रस्ताव ठेवल्याची माहिती आहे. परंतु, हा प्रस्ताव काँग्रेसला अमान्य असल्याचंही नुकतंच समोर आलं होतं. यावरून संजय निरुपम यांनी आज (२८ डिसेंबर) एएनआय या वृत्तसंस्थेला मुलाखत दिली. संजय निरुपम म्हणाले, माझं असं म्हणणं आहे की जागा वाटप हा फार क्लिष्ट विषय असतो. सहजरित्या जागा वाटपाचा निर्णय होणार नाही. इंडिया आघाडीला एकत्र येऊन भाजपाविरोधात लढायचं असेल तर आपण एकमेकांविरोधात लढणं बंद केलं पाहिजे. शिवसेनेने वृत्तपत्रांच्या माध्यमांतून २३ जागांची मागणी केली आहे. २३ जागा खूप जास्त आहेत. ४८ पैकी २३ जागा तुम्हाला दिल्या तर आम्ही कुठून लढणार? सार्वजनिक ठिकाणी किंवा वर्तमानपत्रांतून जागा वाटपाची मागणी करण्यापेक्षा इंडिया आघाडीच्या बैठकीत असा प्रस्ताव ठेवायला हवा. सामनातून मागणी करण्यापेक्षा बैठकीत म्हणणं मांडा", असा खोचक सल्लाही संजय निरुपम यांनी ठाकरे गटाला दिला. गेल्या एक दीड वर्षांत शिवसेना (ठाकरे गट) पूर्णपणे विखुरली आहे. शिवसेनेतील मोठे नेते सोडून गेले, आमदार सोडून गेले.

---

# जेएन.१ : नव्या टास्क फोर्स'ला जुन्यांचे वावडे!

## आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी केली नवीन टास्क फोर्सची घोषणा

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**करोनाच्या पहिल्या लाटेचा सामाना करण्यासाठी राज्य शासनाने नेमलेल्या तज्ज्ञांच्या समितीमधील एकाही डॉक्टरचा समावेश आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी जाहीर केलेल्या नव्या टास्क फोर्समध्ये नसल्यामुळे आरोग्यक्षेत्रात नाराजी व्यक्त केली जात आहे. 'नवा विषाणू नवा टास्क फोर्स' अशी टिप्पणी जुन्या टास्क फोर्समधील एका ज्येष्ठ डॉक्टरांनी केली आहे. गंभीर बाब म्हणजे या नव्या टास्क फोर्समध्ये मुंबईतील एकाही डॉक्टरचा समावेश करण्यात आलेला नाही.**

कोविड- १९ च्या पहिल्या लाटेदरम्यान वाढलेल्या रुग्णसंख्येवर नियंत्रण, त्यावर उपाययोजना करण्यासाठी १३ एप्रिल २०२० रोजी मुंबई महापालिकेच्या केईएम रुग्णालयाचे माजी अधिष्ठाता डॉ संजय ओक यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ डॉक्टरांचे विशेष कृतिदलाची (टास्क फोर्स) निर्मिती करण्यात आली होती. तसेच राज्याच्या मुख्य सचिवांचे करोनाविषय प्रमुख सल्लागार म्हणून डॉ. सुभाष साळुंखे यांची नियुक्ती करण्यात आली होती. जुन्या टास्क फोर्समधील सर्वच तज्ज्ञांनी कोणतेही मानधन न घेता निरपेक्षपणे करोनाकाळात



काम केले होते. यात सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील काही तज्ज्ञ होते. खाजगी रुग्णालयात संसर्गजन्य आजार तसेच मधुमेह तज्ज्ञ असलेले डॉ. राहुल पंडित व डॉ. शशांक जोशी यांचा समावेश होता. मुंबई महापालिकेची सर्व वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांचे संचालक डॉ. अविनाश सुपे यांना करोनाकाळातील मृत्यूंचे विश्लेषण समितीचे अध्यक्ष करण्यात आले होते. आता नव्याने करोना रुग्णांची वाढ होऊ लागल्यानंतर तसेच जेएन.१ या नव्या उपप्रकाराचे रुग्ण सापडू लागल्यानंतर आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी नवीन टास्क फोर्सची घोषणा केली. या टास्क फोर्सच्या अध्यक्षस्थानी आयसीएमआर, दिल्लीचे माजी प्रमुख डॉ. रमण गंगाखेडकर आहेत. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधुरी कानिटकर, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ म्हैसेकर, बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे येथील डॉ. सुरेश कार्यकर्ते, नवले मेडिकल कॉलेज, पुणे येथील डॉ. वर्षा पोतदार, नवले मेडिकल कॉलेज, पुणे येथील फिजिशियन डॉ. डी. बी. कदम सदस्य आहेत.

> "आताच्या करोना टास्क फोर्समधील सर्वच मंडळी आपपाल्या क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत. अध्यक्ष डॉ. रमण गंगाखेडकर यांचा कोविड काळातील अनुभव मोठा आहे. त्यांनी देशपातळीवर काम केले आहे. तसेच राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक डॉ. म्हैसेकरांपासून सर्व मंडळींनी करोना काळात काम केलेले आहे. महत्त्वाचे म्हणजे आवश्यकतेनुसार जुन्या टास्क फोर्समधील तज्ज्ञांशी आम्ही नक्की संपर्क साधू. करोनाचा सामना हेच आमचे लक्ष्य आहे. लोकांना सर्वोत्तम उपचार मिळणे यालाच आरोग्य विभागाचे प्राधान्य आहे.
>
> **-आरोग्य आयुक्त धीरजकुमार**
> (सदस्य सचिव टास्क फोर्स)

# मोदींनी किती लोकांना रोजगार दिला?

## तरुणांचं पोट सोशल मीडियावर भरणार नाही : राहुल गांधी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**नागपूरमध्ये काँग्रेसच्या स्थापना दिनानिमित्ताने जाहीर सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. या सभेसाठी पक्षातील अनेक ज्येष्ठ नेत्यांसह राहुल गांधीही उपस्थित होते. यावेळी केलेल्या भाषणात राहुल गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर परखड शब्दांत हल्लाबोल केला. तसेच, काँग्रेसनं आत्तापर्यंत काय केलं? या भाजपाच्या प्रश्नावरही राहुल गांधींनी प्रत्युत्तर दिलं. यावेळी त्यांनी अग्निवीर योजनेचाही उल्लेख करताना देशातील तरुणांचं पोट सोशल मीडियावर भरणार नाही असं म्हणत बेरोजगारीच्या मुद्द्यावर बोट ठेवलं.**

स्वातंत्र्याच्या आधी जर तुम्ही या देशात आले असता, तर तेव्हा इथे ५००-६०० राजे होते, इंग्रज होते. भारतीय जनतेला कुठलाच अधिकार नव्हता. गरीबाची जमीन जर राजाला चांगली वाटली, तर एका सेकंदात तो राजा ती जमीन घेऊ शकत होता. या सगळ्या अधिकारांचं रक्षण राज्यघटना करते. आंबेडकरांनी, गांधीजींनी, नेहरूंनी मेहनतीनं ती बनवली. ती काँग्रेस पक्षानं दिली आहे. आरएसएसचे लोक याच्या विरोधात होते. आज राष्ट्रध्वजाच्या समोर उभं राहून हे सलाम ठोकतात. पण कित्येक वर्षं यांनी तिरंग्याला सलाम नव्हता केला", अशा शब्दांत राहुल गांधींनी भाजपाबरोबरच राष्ट्रीय स्वयंसेवक संघालाही लक्ष्य केलं. "देशाच्या हजारो वर्षांच्या इतिहासात एक गोष्ट पहिल्यांदा घडली. पहिल्यांदाच एका भारतीय व्यक्तीला एक मत देण्यात आलं. तो दलित असो, आदिवासी असो, महिला असो, कुठल्याही भागातला असो. प्रत्येक भारतीयाला राज्यघटनेनं एक मत दिलं. हे काँग्रेस पक्षानं केलं. गांधीजी तुरुंगात गेले. नेहरू तुरुंगात गेले. आंबेडकरांनी कित्येक वर्षं संघर्ष केला. हे काँग्रेस पक्षानं, आंबेडकरांनी, सगळ्यांनी मिळून केलं आहे", असंही राहुल गांधी यावेळी म्हणाले. "जर तुम्ही इथे स्वातंत्र्यापूर्वी आले असते, तर तेव्हा भारतातील जनतेला कोणतेच अधिकार नव्हते. ही आरएसएसची विचारसरणी आहे. हे आम्ही बदललं आहे. पुन्हा एकदा हे भारताला त्याच काळात घेऊन जात आहेत", असंही त्यांनी नमूद केलं. "राज्यघटनेतून, तुमच्या मतदानातून वेगवेगळ्या संस्था तयार होतात. या तुमच्या संस्था आहेत. सर्वोच्च न्यायालय असो, निवडणूक आयोग असो. सगळ्या संस्थांवर हे ताबा मिळवत आहेत. भारतातील सर्व विद्यापीठांमधले सर्व कुलगुरू आज एकाच संघटनेचे आहेत. त्यांना येत तर काहीच नाही. भारताचे कुलगुरू आज मेरिटवर निवडले जात नाहीत. जर तुम्ही एका संघटनेत असाल तर तुम्हाला कुलगुरू होता येईल. ज्या संस्थांच्या माध्यमातून तुम्ही देश चालवू शकता, त्या सर्व संस्थांवर हे ताबा मिळवून बसले आहेत", असा आरोप यावेळी राहुल गांधींनी केला. "गेल्या १० वर्षांमध्ये नरेंद्र मोदींनी किती लोकांना रोजगार दिला? ४० वर्षांपासून सर्वात जास्त बेरोजगारी आजघडीला आहे. देशाच्या कोट्यवधी तरुणांची शक्ती वाया जात आहे. आजकाल देशातला तरुण नोकरी करत नाही. तो ७-८ तास मोबाईलवर इन्स्टाग्राम, फेसबुकवर आहे. हे भारताचं सत्य आहे. त्याची ताकद वाया जात आहे. एकीकडे शेतकऱ्यांवर, तरुणांवर हल्ले आणि दुसरीकडे देशाच्या दोन-तीन श्रीमंतांना देशातली सर्व संपत्ती दिली जात आहे. हे सत्य आहे", अशी टीका राहुल गांधींनी केली. "काही दिवस आधी माझ्याजवळ काही तरुण आले आणि म्हणाले राहुलजी, अग्निवीर योजनेच्या आधी आम्हाला लष्करात घेतलं होतं. दीड लाख तरुणांना लष्करानं आणि वायूदलानं स्वीकारलं होतं. मोदी सरकारने अग्निवीर योजना लागू केली आणि दीड लाख तरुणांना त्यांनी लष्करात येऊ दिलं नाही. ते सरकारनं आमचं आयुष्य बरबाद केलं आहे. आता आमची चेष्टा केली जात आहे. गावात आम्हाला आता खोटे सैनिक म्हटलं जातं. यानं देशाचा फायदा होणार नाहीये. सगळा फायदा, देशाची संपत्ती निवडक लोकांच्या हातात जात आहे", असा आरोप राहुल गांधींनी केला.



### भारताला 90 लोक चालवतात

भारताला ९० लोक चालवतात. मी संसदेत विचारलं की यातले ओबीसी किती आहेत? दलित किती आहेत? आदिवासी किती आहेत? भाजपाचे लोक शांत झाले. देशात किमान ५० टक्के ओबीसी, १५ टक्के दलित आणि १२ टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. पण ९० अधिकाऱ्यांपैकी फक्त ३ ओबीसी आहेत. हे कसलं ओबीसी सरकार चाललं आहे? त्यांना कोपऱ्यात बसवून देतात. देशातील सर्वात मोठ्या १००-२०० कंपन्यांमध्ये कोण ओबीसी आहे? कोण दलित आहे? कोण आदिवासी आहे? हे मला दाखवून द्या. राज्यांच्या अधिकारी वर्गातही दाखवून द्या. मी म्हटलं जातीआधारीत जनगणना व्हायला पाहिजे. देशात ओबीसी किती आहेत हे कळायला पाहिजे. तेव्हापासून नरेंद्र मोदींचं भाषण बदललं. आधी स्वतःला ओबीसी म्हणायचे. आता म्हणतात भारतात फक्त एकच जात आहे ती म्हणजे गरीब. मग तुम्ही ओबीसी कसे झालात?" असा सवाल राहुल गांधींनी नरेंद्र मोदींना केला आहे.

# नितीशकुमार यांच्या पक्षात रामायण!

## पुढील 24 तासात तगडा निर्णय होण्याची शक्यता

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**राजधानी नवी दिल्लीत जनता दल युनायटेडच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीनंतर दिल्ली जेडीयूचे अध्यक्ष शैलेंद्र कुमार म्हणाले की, लालन सिंह अध्यक्ष आहेत, आधीही होते आणि भविष्यातही राहतील. ते पुढे म्हणाले की, शुक्रवारी (29 डिसेंबर) राष्ट्रीय कार्यकारिणी आणि परिषदेची बैठक होणार आहे.**



शुक्रवारी होणाऱ्या बैठकीत लालन सिंह जेडीयूच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचा राजीनामा देऊ शकतात आणि नितीश कुमार या पदाचा कार्यभार स्वीकारू शकतात, असे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. यापूर्वीही नितीश कुमार जेडीयूचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. अशा स्थितीत आता शुक्रवारी होणाऱ्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे विरोधकांची एकजूट करण्यासाठी इंडिया आघाडीसाठी प्रयत्न करणाऱ्या नितीश कुमार यांच्याच पक्षात रामायण सुरु आहे. बैठक सुरू होण्यापूर्वी, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि राष्ट्रीय अध्यक्ष लालन सिंह राष्ट्रीय अधिकाऱ्यांच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी एकत्र जंतरमंतर येथील पक्ष कार्यालयात पोहोचल्याचे चित्र समोर आले. नितीश कुमार यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीनंतर दोन्ही नेत्यांनी एकत्र येण्याचा निर्णय घेतला. पक्षातील एकीचा संदेश देण्याचा त्यांचा उद्देश दिसून आला. पक्षाच्या सूत्रांनी शुक्रवारी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणी आणि कौन्सिलच्या बैठकीत जेडीयूच्या अध्यक्षपदावरून सिंह हे पद सोडण्याची शक्यता नाकारली नाही. नितीशकुमार ही जबाबदारी सांभाळू शकतात, असे पक्षाच्या एका नेत्याने सांगितले. तथापि, जेडीयूच्या दोन्ही प्रमुख नेत्यांकडून या संदर्भात कोणतीही पुष्टी झालेली नाही, असे ते म्हणाले. तत्पूर्वी, लालन सिंह यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याचे वृत्त फेटाळून लावले आणि ते म्हणाले की, केंद्रातील सत्ताधारी भाजपच्या इशाऱ्यावर मीडियातून हे चित्र उभं केलं जात आहे.पदाधिकाऱ्यांच्या बैठकीपूर्वी ते पक्षाच्या राजीनामा देतील अशी अटकळ असताना सिंह म्हणाले की ही बैठक नेहमीची होती आणि पक्ष एकसंध आहे. "मला राजीनामा द्यावा लागला तर मी तुम्हाला सांगेन," असेही ते उपहासाने म्हणाले. मी प्रसारमाध्यमांना फोन करेन आणि राजीनामा पत्रात काय लिहायचे याबद्दल तुमचा सल्ला घेईन जेणेकरून तुम्ही भाजप कार्यालयात जाऊन मसुदा मिळवू शकाल, असा उपरोधिक टोलाही लगावला.

# पेट्रोल डिझेल 8 रुपयांनी कमी होण्याची शक्यता!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**समस्त जनसामान्यांसाठी मोठी बातमी आहे. येत्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलचे दर 7 ते 8 रुपयांनी कमी (PETROL DIESEL PRICE) होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुंबईत पेट्रोल 106 रुपयांवरून 98 ते 99 रुपये प्रति लिटरवर येण्याची चिन्हं आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाल्यामुळे तसेच आगामी लोकसभेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन केंद्र सरकार हा निर्णय घेण्याची शक्यता आहे.**

यंदाच्या तिमाहीत तिन्ही सरकारी कंपन्यांना मिळून 28 हजार कोटींचा नफा झाला आहे. गेल्या तीन तिमाहींचा विचार केला तर हा नफा एक लाख कोटींच्या घरात आहे. आणखी एक मोठं कारण म्हणजे गेल्या वर्षभरात आंतरराष्ट्रीय बाजारांत तेलाचे दर 75 डॉलर प्रति बॅरेलपेक्षाही कमी झालेत. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे येत्या एप्रिल आणि मेमध्ये लोकसभा निवडणुका आहे. त्या अनुषंगानं देखील केंद्र सरकारनं हा निर्णय घेतल्याचं बोललं जातंय. देशातील पेट्रोल आणि डिझेलच्या किमती गेल्या 589 दिवसांपासून स्थिर आहेत. त्यांच्या किमतीतील शेवटचा बदल मे 2022 मध्ये दिसून आला. आता कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाल्यामुळे देशातील पेट्रोल आणि डिझेलच्या किमती कमी करण्याचा निर्णय केंद्र सरकार घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. ही किंमत 7 ते 8 रुपयांनी कमी होण्याची शक्यता आहे.

# मला ओळखत नाहीत त्यांनी शांत राहावे:श्रुती हासन

गेल्या काही दिवसांपासून श्रुती हासनने तिचा बॉयफ्रेंड शंतनू हजारिकासोबत लग्न केल्याची अफवा पसरली होती. आता लग्नाच्या सततच्या बातम्यांदरम्यान, श्रुती आणि तिच्या प्रियकराने स्पष्टीकरण दिले आहे आणि अफवा पसरवणाऱ्यांना विशेष विनंती केली आहे. मंगळवारी संध्याकाळी लग्नाची बातमी आल्यानंतर श्रुती हासनने सोशल मीडियावर स्पष्टीकरण दिले आहे. तिने इंस्टाग्राम स्टोरीवर लिहिले आहे, माझे लग्न झालेले नाही. आयुष्याच्या प्रत्येक बाबतीत अगदी मोकळेपणाने बोलणारी माझ्यासारखी व्यक्ती लग्नाची गोष्ट का लपवेल? जे मला अजिबात ओळखत नाहीत त्यांनी शांत राहावे. श्रुतीचा प्रियकर शंतनू हजारिका याने सोशल मीडियावर लिहिले आहे, तुम्ही सर्वांनी शांत राहण्याची गरज आहे. आमचे लग्न झालेले नाही. जे लोक आम्हाला ओळखत नाहीत त्यांनी कृपया अफवा पसरवू नये. अलीकडेच ओरी ऊर्फ ओरहान अवतारमणीचे इंस्टाग्रामवर आस्क मी एनीथिंग सेशन होते. यादरम्यान एका चाहत्याने त्याला विचारले की, असा कोणी सेलिब्रिटी आहे का ज्याने तुमच्यासोबत फोटो क्लिक करण्यास नकार दिला आहे आणि उद्धटपणा दाखवला आहे. नाव घेता येत नसेल तर हिंट द्या. याला उत्तर देताना ओरीने श्रुती हासनचे नाव घेतले. तो म्हणाला, मी कधीच तिच्यासोबत फोटो क्लिक करायला सांगितले नाही, आम्ही एका कार्यक्रमात भेटलो, जिथे ती माझ्यासोबत खूप उद्धटपणे वागत होती. मी तिला ओळखतही नाही. मला खूप वाईट वाटलं. मला वाटतं काही गैरसमज झाला असावा कारण मी तिच्या पतीला चांगले ओळखतो आणि त्याला पसंत करतो. आमचा गैरसमज ताबडतोब दूर झाला, पण नंतर मला कळले की तिने मला प्यून किंवा स्पॉटबॉय म्हटले होते. ओरीने शंतनू हजारिकाला श्रुती हासनचा प्रियकर नव्हे तर नवरा म्हणून संबोधताच त्यांच्या लग्नाच्या बातम्या सुरू झाल्या. कारण ओरीने तो शंतनूचा मित्र असल्याचंही म्हटलं आहे. श्रुती हासन गेल्या ३-४ वर्षांपासून शंतनूसोबत रिलेशनशिपमध्ये आहे. शंतनू हा कलाकार आहे. आजकाल श्रुती हासन प्रभाससोबत सालार पार्ट-१: सीझफायर या चित्रपटात दिसत आहे. याशिवाय अभिनेत्री द आय आणि डकोइटमध्ये दिसणार आहे. हे दोन्ही चित्रपट 2024 मध्ये प्रदर्शित होणार आहेत.



## सिद्धार्थ चांदेकरवर 'श्रीदेवी प्रसन्न'!

२०२४ ला लवकरच सुरुवात होणार आहे. या वर्षात अनेक हिंदी - मराठी सिनेमांची पर्वणी लोकांना पाहायला मिळणार आहे. अशातच २०२४ मधील नवीन मराठी सिनेमाची घोषणा झालीय. हा सिनेमा म्हणजे श्रीदेवी प्रसन्न. नावापासुनच वेगळेपणा असणाऱ्या या सिनेमाबद्दल अधिक जाणून घ्या. "श्रीदेवी प्रसन्न" या चित्रपटातून मोस्ट ग्लॅमरस अभिनेत्री सई ताम्हणकर आणि स्मार्ट अँड डॅशिंग म्हणून ओळखला जाणारा अभिनेता सिद्धार्थ चांदेकर अशी भन्नाट आणि बेमिसाल जोडी प्रथमच रुपेरी पडद्यावर एकत्र आहे. आजवर अनेक हीट चित्रपट देणारे हे दोन्ही दमदार कलाकार एकत्र येऊन एक वेगळीच प्रेमकहाणी फुलवणार आहेत. या निमित्ताने नव्या वर्षात, एक नवी आणि आगळीवेगळी लव्ह स्टोरी आपल्या लाडक्या जोडीसह प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे.

## डिमरीला मोठा चित्रपट मिळाला

रणबीर कपूर आणि रश्मिका मंदान्ना यांच्या 'ॲनिमल' चित्रपटात झोयाची चमकदार भूमिका साकारून राष्ट्रीय क्रश बनलेली अभिनेत्री तृप्ती डिमरी हिला एक मोठा चित्रपट मिळाला आहे. वृत्तांवर विश्वास ठेवला तर, तृप्ती आशिकी 3 या चित्रपटात कार्तिक आर्यनसोबत रोमान्स करताना दिसणार आहे. पिंकविलाच्या अलीकडील अहवालानुसार, राष्ट्रीय क्रश तृप्ती डिमरीने कार्तिक आर्यनसोबत आशिकी 3 हा चित्रपट साइन केला आहे. मात्र, अद्याप या प्रकरणी कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. काही अहवालांमध्ये असेही मानले जाते की तृप्तीची निर्मात्यांसोबत बैठक घेतली आहे, मात्र तिचे नाव अद्याप निश्चित झालेले नाही. आशिकी 3 चित्रपटाची घोषणा नोव्हेंबर 2023 मध्ये झाली होती. घोषणेसोबतच या चित्रपटाचा मुख्य अभिनेता कार्तिक आर्यन असेल असेही सांगण्यात आले. तर मुख्य अभिनेत्रीचे नाव अद्याप जाहीर झालेले नाही. दरम्यान, या चित्रपटात फातिमा सना शेख किंवा लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री जेनिफर विंगेट महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार असल्याची बातमी आहे. आता या चित्रपटाशी तृप्ती डिमरीचे नाव जोडले गेल्याने ती फातिमा किंवा जेनिफरची जागा घेऊ शकते, अशी अटकळ बांधली जात आहे. आशिकी 3 ची निर्मिती मुकेश भट्ट करत आहेत, ज्याचे दिग्दर्शन अनुराग बसू करणार आहेत. काही काळापूर्वी या चित्रपटासाठी क्रिती सेनन आणि कियारा अडवाणी यांचीही नावे पुढे आली होती.



## ईशा कोप्पीकर अन् टीमी नारंग यांचा घटस्फोट!

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री ईशा कोप्पीकर ही आता वेगळ्याच कारणांमुळे चर्चेत आली आहे. तिचा आणि टीमी नारंग यांचा घटस्फोट झाल्याच्या बातम्यांना उधाण आले आहे. १४ वर्षांच्या सहजीवनानंतर त्यांनी वेगळं होण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे.

बॉलीवूडची 'खल्लास गर्ल' म्हणून लोकप्रिय झालेल्या ईशा कोप्पीकरच्या या बातमीनं तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. टीमी आणि ईशा गेल्या १४ वर्षांपासून एकमेकांसोबत होते. त्यांना एक मुलगीही आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ईशा आणि टीमीनं गेल्या महिन्यातच घटस्फोट घेतला आहे. यासंबंधीची अधिक माहिती टाईम्स ऑफ इंडियानं देखील दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार ईशा ही तिच्या ९ वर्षांच्या मुलीसह टीमीचं घर सोडून दुसरीकडे राहण्यास गेली आहे. यापूर्वी ज्या काही बातम्या समोर आल्या होत्या त्यातून दोघांनी देखील हे नातं जपण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला मात्र त्यांच्यातील विसंवादामुळे ते नातं फार काळ टिकू शकलं नाही. त्यामुळे त्यांनी अखेर विभक्त होण्याचा निर्णय घेतला. ईशा आणि टीमीच्या लवस्टोरीविषयी सांगायचे झाल्यास त्यांनी एकमेकांना तीन वर्षांपर्यंत डेट केले होते. त्यानंतर २००९ मध्ये त्यांनी लग्न केले. ईशानं बॉलीवूड सोडून बिझनेसमध्ये करिअर करण्याचा निर्णय घेतला होता. तिच्या बॉलीवूड प्रोजेक्टविषयी सांगायचे झाल्यास, ईशा शेवटी अलयान नावाच्या तमिळ चित्रपटामध्ये दिसली होती. त्यापूर्वी तिनं लव यू लोकतंत्र, अस्सी नब्बे पुरे सौ, कवचा सारख्या चित्रपटांमध्ये देखील काम केले होते. तिच्या बच के रहना तू बच के रहना, खल्लास...नावाच्या गाण्यावर केलेला डान्स लोकप्रिय झाला होता.बॉलीवूडची 'खल्लास गर्ल' म्हणून लोकप्रिय झालेल्या ईशाच्या या बातमीनं तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे.

## प्रसिद्ध अभिनेत्री हिना खान रुग्णालयात

टीव्ही मनोरंजन आणि चित्रपट विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री हिना खान हिच्या चाहत्यांसाठी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. ती म्हणजे तिला तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आली आहे. या घटनेनंतर चाहत्यांनी काळजी व्यक्त केली आहे. हिनानं आपल्या प्रकृतीबाबत सोशल मीडियावर पोस्ट शेयर करुन याबाबत माहिती दिली आहे. तिला मुंबईतील एका रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. हिनाला ताप आल्यानं तिला ॲडमिट करण्यात आल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. तिनं तिचे रुग्णालयातील फोटो देखील यावेळी शेयर केले आहेत. त्या फोटोंवर चाहत्यांनी कमेंट करत हिनाला काळजी घेण्यास सांगितले आहे. हिनानं तिच्या इंस्टा अकाउंटवरुन शेयर केलेला फोटो चाहत्यांच्या प्रतिक्रियांचा विषय आहे. हिनाला १०२ एवढा ताप असल्याचे तिनं म्हटले आहे. गेल्या चार रात्री मी काही झोपलेले नाही. मी तापानं खूप बेजार आहे. ताप काही कमी होण्याचे नाव घ्यायला तयार नाही. अशातच मला रुग्णालयात दाखल व्हावे लागले आहे. खूपच अशक्तपणा आला आहे. असेही हिनानं म्हटले आहे. हिनाच्या प्रोजेक्टविषयी पाहायचे झाल्यास तिचा कंट्री ऑफ ब्लाईंड नावाचा चित्रपट २०२४ च्या ऑस्करसाठी नॉमिनेट झाल्याचे बोलले जात आहे. त्यात तिनं केलेली भूमिका चाहत्यांच्या कौतुकाचा विषय आहे. या चित्रपटामध्ये अनुष्का सेन, शोएब निकाश शहा, नमिता लाल, इनाम उल हक, प्रद्युम्न सिंग मॉल आणि जितेंद्र राय यांच्या महत्वाच्या भूमिका आहेत.



# कोहलीच्या संघर्षानंतर भारताचा पराभव!

## » आफ्रिकेने एक डाव 32 धावांनी उडवला धुव्वा

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**सेंच्युरियनमध्ये भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना एक डाव आणि ३२ धावांनी गमावला. गुरुवारी (२८ डिसेंबर) सामन्याच्या तिसऱ्या दिवशी टीम इंडिया दुसऱ्या डावात १३१ धावांवर सर्वबाद झाली. तत्पूर्वी, भारताने पहिल्या डावात २४५ धावा केल्या होत्या. त्याचवेळी दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात ४०८ धावा केल्या. आफ्रिकन संघाकडे पहिल्या डावात १६३ धावांची आघाडी होती. दक्षिण आफ्रिकेच्या या विजयात डीन एल्गर, मार्को जॅन्सेन आणि कागिसो रबाडाने मोलाचे योगदान दिले. हा सामना जिंकून दक्षिण आफ्रिकेने मालिकेत १-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे.**





विराट कोहलीच्या रूपाने भारताला १०वा धक्का बसला. मार्को जॅन्सेनच्या चेंडूवर त्याने अप्रतिम फटका मारला, पण धावत जाऊन कागिसो रबाडाने उत्कृष्ट झेल घेतला. विराट ८२ चेंडूत ७६ धावा करून कोहली बाद झाला. त्याने आपल्या खेळीत १२ चौकार आणि एक षटकार मारला. दरम्यान दक्षिण आफ्रिकेत पहिल्यांदाच मालिका जिंकण्याचे भारतीय संघाचे स्वप्नही भंगले. आता दुसरी कसोटी ३ जानेवारीपासून केपटाऊनमध्ये खेळवली जाणार आहे. हा सामना जिंकून मालिकेत १-१ अशी बरोबरी करण्याकडे भारतीय संघाचे लक्ष असेल. दुसऱ्या डावात भारताकडून विराट कोहलीने सर्वाधिक ७६ धावा केल्या. तसेच शुबमन गिलने २६ धावा केल्या. या दोघांशिवाय टीम इंडियाच्या एकाही फलंदाजाला दुहेरी आकडा गाठता आला नाही. श्रेयस अय्यर सहा, यशस्वी जैस्वाल पाच, केएल राहुल चार, मोहम्मद सिराज चार आणि शार्दुल ठाकूर दोन धावा करून बाद झाला. रोहित शर्मा आणि रविचंद्रन अश्विन यांना खातेही उघडता आले नाही. प्रसिध कृष्णा खाते न उघडता नाबाद राहिला. दक्षिण आफ्रिकेकडून नांद्रे बर्गरने चार, मार्को जॅनसेनने तीन आणि कागिसो रबाडाने दोन गडी बाद केले. तत्पूर्वी तिसऱ्या दिवशी डीन एल्गरने शानदार फलंदाजी केली आणि तो द्विशतकाच्या जवळ असताना १८५ धावांवर तो शार्दुल ठाकूरच्या शॉर्ट बॉलवर केएल राहुलच्या हाती झेलबाद झाला. यानंतर अश्विनने १९ धावांच्या स्कोअरवर कोईट्झेला बाद केले. शेवटी बुमराहने रबाडाला एका धावेवर आणि नांद्रे बर्जरला शून्यावर बाद केले. आफ्रिकेचा कर्णधार टेंबा बावुमा दुखापतीमुळे फलंदाजीला आला नाही आणि आफ्रिकेचा डाव ४०८ धावांवर आटोपला. दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार डीन एल्गरने शतक झळकावले. तो 185 धावा करून झेलबाद झाला. त्याला शार्दुल ठाकूरने यष्टिरक्षक केएल राहुलच्या हाती झेलबाद केले. डीन एल्गरने 140 चेंडूत 14 वे कसोटी शतक पूर्ण केले. एल्गरने टोनी डीजॉर्जसोबत 93, डेव्हिड बेडिंगहॅमसोबत 131 आणि मार्को जॅन्सनसोबत 111 धावांची भागीदारी केली. एल्गर त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील शेवटची मालिका खेळत आहे, या मालिकेपूर्वीच त्याने निवृत्ती जाहीर केली होती. दक्षिण आफ्रिकेकडून 8व्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या मार्को जॅन्सनने तिसऱ्या दिवशी डीन एल्गरसह संघाच्या डावाचे नेतृत्व केले. सेट झाल्यानंतर दोघांनीही खराब चेंडूंवर मुक्तपणे शॉट्स खेळले. यान्सनने आपल्या कसोटी कारकिर्दीतील दुसरे अर्धशतक 87 चेंडूत पूर्ण केले. त्याने डीन एल्गरसोबत 111 धावांची भागीदारी केली. पाऊस आणि खराब प्रकाशामुळे सुपरस्पोर्ट पार्क स्टेडियममधील पहिल्या आणि दुसऱ्या दिवशीचा खेळ लवकर संपला. तिसऱ्या ते पाचव्या दिवसापर्यंत दररोज जास्तीत जास्त 98 षटके खेळली जातील. पहिल्या दिवशी केवळ 59 षटके आणि दुसऱ्या दिवशी 75 षटकेच खेळता आली. दोन्ही दिवशी मिळून सुमारे 45 षटके कमी टाकण्यात आली होती, त्यामुळे ती कव्हर करण्यासाठी आता दररोज 8 अधिक षटके टाकली जातील. पुरुषांच्या कसोटीमध्ये सामान्यतः एका दिवसात 90 षटकांचा खेळ असतो. दुसऱ्या दिवशी भारताने 208/8 धावसंख्येवरून खेळण्यास सुरुवात केली. केएल राहुलने 101 धावा केल्या आणि संघ 245 धावा करून सर्वबाद झाला. कागिसो रबाडाने 5 बळी घेतले. दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात 5 गड्यांच्या मोबदल्यात 256 धावा केल्या आणि 11 धावांची आघाडी घेतली. डीन एल्गर 140 धावा करून संघाकडून नाबाद राहिला.

### रबाडाने उत्कृष्ट झेल घेतला

» सेंच्युरियनमध्ये भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना एक डाव आणि ३२ धावांनी गमावला. गुरुवारी (२८ डिसेंबर) सामन्याच्या तिसऱ्या दिवशी टीम इंडिया दुसऱ्या डावात १३१ धावांवर सर्वबाद झाली. तत्पूर्वी, भारताने पहिल्या डावात २४५ धावा केल्या होत्या. त्याचवेळी दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात ४०८ धावा केल्या. आफ्रिकन संघाकडे पहिल्या डावात १६३ धावांची आघाडी होती. विराट कोहलीच्या रूपाने भारताला १०वा धक्का बसला. मार्को जॅन्सेनच्या चेंडूवर त्याने अप्रतिम फटका मारला, पण धावत जाऊन कागिसो रबाडाने उत्कृष्ट झेल घेतला. विराट ८२ चेंडूत ७६ धावा करून कोहली बाद झाला. त्याने आपल्या खेळीत १२ चौकार आणि एक षटकार मारला. दरम्यान दक्षिण आफ्रिकेत पहिल्यांदाच मालिका जिंकण्याचे भारतीय संघाचे स्वप्नही भंगले. आता दुसरी कसोटी ३ जानेवारीपासून केपटाऊनमध्ये खेळवली जाणार आहे. हा सामना जिंकून मालिकेत १-१ अशी बरोबरी करण्याकडे भारतीय संघाचे लक्ष असेल.

# महिला क्रिकेट-भारताचे ऑस्ट्रेलियासमोर 283 धावांचे लक्ष्य

## » जेमिमा आणि पूजाचे अर्धशतक, गार्डनर-वेरहमने घेतल्या 2-2 विकेट

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय महिला क्रिकेट संघ आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना आज मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवला जात आहे. भारताने ऑस्ट्रेलियाला 283 धावांचे लक्ष्य दिले आहे. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी केली. संघाने आठ गडी गमावून 282 धावा केल्या.**





जेमिमाह रॉड्रिग्ज आणि पूजा वस्त्राकर यांनी अर्धशतकी खेळी खेळली. तर, यास्तिका भाटियाचे अर्धशतक हुकले. ऑस्ट्रेलियातर्फे जॉर्जिया वेअरहॅम आणि ॲशले गार्डनर यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. प्रथम फलंदाजीला आलेल्या भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली नाही. अवघ्या 12 धावांवर संघाला पहिला धक्का बसला. सलामीवीर शेफाली वर्मा 1 धाव करून बाद झाली. मेगन शटच्या चेंडूवर तिला जॉर्जिया वेअरहॅमने झेलबाद केले. जेमिमाने संघाकडून सर्वाधिक 82 धावा केल्या. जेमिमाहचे वनडे कारकिर्दीतील हे 5वे अर्धशतक आहे. तिने ॲशले गार्डनर ताहलिया मॅकग्राकडे झेलबाद केले. पूजाने 62 धावांची नाबाद खेळी खेळली. पूजाचे वनडेतील हे चौथे अर्धशतक आहे. सलामीवीर यस्तिका भाटिया 49 धावा करून बाद झाली. ऑस्ट्रेलियातर्फे जॉर्जिया वेअरहॅम आणि ॲशले गार्डनर यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. फिरकीपटू गार्डनरने दोन महत्त्वाचे बळी घेतले. तिने रॉड्रिग्ज आणि कर्णधार हरमनप्रीत कौरला बाद केले. त्यांच्याशिवाय डार्सी ब्राउन, मेगन शट, ॲनाबेल सदरलँड आणि एलाना किंग यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. प्रथम फलंदाजी करताना भारताने ५० षटकांत आठ गडी गमावून २८२ धावा केल्या. भारताकडून जेमिमाह रॉड्रिग्जने सर्वाधिक ८२ धावा केल्या. पूजा वस्त्राकरने नाबाद ६२ धावांचे योगदान दिले. ऑस्ट्रेलियाकडून ॲशले गार्डनर आणि जॉर्जिया वेअरहॅमने प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. डार्सी ब्राउन, ॲनाबेल सदरलँड, मेगन शुट आणि अलाना किंग यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.भारतीय महिला क्रिकेट संघ आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना आज मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवला जात आहे.

### भारतीय संघाची खराब सुरुवात

» भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. शफाली वर्मा पुन्हा एकदा खराब फटका मारून बाद झाली, एक धाव घेतल्यानंतर तिला डार्सी ब्राउनने क्लीन बोल्ड केले. यानंतर यस्तिका भाटियाने ऋचा घोषबरोबर दुसऱ्या विकेटसाठी २९ धावांची भागीदारी केली. रिचा २० चेंडूत ४ चौकारांच्या मदतीने २१ धावा करून बाद झाली.